॥ श्रीनवनाथभक्तिसार ॥

# Shri Navnath Bhaktisar

## ADHYAYA 17 — SAPTADASHODHYAYA

श्रीगणेशाय नमः । श्रीगुरुभ्यो नमः । श्रीपांडुरंगाय नमः । श्रीकुलदेवतायै नमः । श्रीमातापितृभ्यां नमः ।

***Shri Ganeshaaya Namah | Shri Gurubhyo Namah | Shri Paandurangaaya Namah | Shri Kuladevataayai Namah | Shri Maataa pitribhyaam Namah |***

### Summary

*Chapter 17 opens with Kanifnath, now shown exactly where Jalindarnath lies buried, weighing how to dig him out safely -- Jalindarnath's old curse against whoever buried him will incinerate anyone who admits to the deed while digging. Kanifnath's plan: cast five statues of Gopichand in gold, silver, copper, brass, and iron, and have the king dig behind each in turn, giving his true name whenever a voice challenges him from below. One after another the decoy statues are reduced to ash the instant Gopichand's name is spoken, while Gopichand himself goes unharmed. Underground, Jalindarnath marvels at these repeated miraculous escapes and grows suspicious that someone other than Gopichand must now be doing the digging.*

*Kanifnath takes his own turn at digging and, asked who approaches, answers honestly with his own name; recognizing his fellow disciple, Jalindarnath withholds his curse, blesses Gopichand with long life, and has the earth cleared by mantra until he finally emerges after years underground, embracing both Kanifnath and Gopichand. Queen Mainavati, overcome, pours out an extended lament for the years of separation before Jalindarnath comforts her. He then puts the choice squarely to Gopichand -- transient kingship or eternal renunciation -- citing Vishvamitra and other kings who gave up their thrones for the ascetic path. Weighing his guru's own hard-won, death-defying austerity against the fleeting nature of royal splendor, Gopichand chooses renunciation, and Jalindarnath initiates him fully into the Nath order: matted locks, loincloth, earrings, patched cloak, horn, digging-staff, and ash-pouch.*

*Word of the king's renunciation throws the palace into mourning: his eighteen hundred wives collapse in grief, blame Mainavati, and recall his tenderness to each of them in turn, then try every means to dissuade him -- offering jewels, robes, palace comforts, and every possible temptation -- but Gopichand, now a wandering mendicant, refuses each in turn as he begs alms through the town. Watching in secret, Mainavati fills his bowl herself so he need not go without. With his path settled, Jalindarnath crowns Gopichand's son Muktichand as king and sends Gopichand off to twelve years of tapasya at Badrikashram, touching molten iron with his toe as his vow. The whole city turns out in a grieving procession before turning back, and the chapter closes with Gopichand setting off toward his sister's village, promising the next chapter's story there.*

## Ovee 1

जयजयाजी वैकुंठाधीश । अलक्ष अगोचरा आदिपुरुषा । पूर्णब्रह्म निष्कल निर्दोषा । सनातना आदिमूर्ते ॥

Transliteration

Jaya-jaya-ji Vaikuntha-adheeshaa | Alaksha agocharaa Aadi-purushaa | Poorna-Brahma nishkala nirdoshaa | Sanaatanaa Aadi-moorte ||

## Ovee 2

ऐसा स्वामी पंढरीअधीश । बैसूनि मालूचे कवित्वपृष्ठीस । भक्तिसारसुधारस । निर्माण केला ग्रंथासी ॥

Transliteration

Aisaa svaamee Pandharee-adheeshu | Baisuni Maalooche kavitva-prishtheesu | Bhaktisaara-sudhaarasu | Nirmaana kelaa granthaasee ||

## Ovee 3

तरी मागिले अध्यायीं कथन । कानिफा पातला हेलापट्टण । गोपीचंदाची भेटी घेऊन । मैनावतीसी भेटला ॥

Transliteration

Taree maagile adhyaayee kathanu | Kaaniphaa paatalaa Helaapattanu | Gopeechandaa-chee bhetee gheunu | Mainaavateesee bhetalaa ||

## Ovee 4

तरी सिंहावलोकनीं तत्त्वतां । मैनावती भेटूनि नाथा । सकळ वृत्तांत सांगूनि सुता । समाधानीं मिरवले ॥

Transliteration

Taree sinhaa-valokanee tattvataa | Mainaavatee bhetuni Naathaa | Sakala vrittaanta sanguni sutaa | Samaadhaanee miravale ||

## Ovee 5

असो गोपीचंद दुसरे दिनीं । नाथागृहें शिबिरीं जाऊनि । मौळी ठेवूनि नाथाचे चरणीं । उभा राहिला सन्मुख ॥

Transliteration

Aso Gopeechanda dusare dinee | Naathaa-grihe shibiree jauni | Maulee thevuni Naathaa-che charanee | Ubhaa raahilaa sanmukhu ||

## Ovee 6

कानिफा पाहूनि राव दृष्टीं । बोलता झाला स्ववाग्वटी । श्रीजालिंदर महीपोटी । कोठे घातला तो सांग पां ॥

Transliteration

Kaaniphaa pahuni raava drishtee | Bolataa jhaalaa svavaagvatee | Shree Jaalindara mahee-potee | Kothe ghaatalaa toh saanga paa ||

## Ovee 7

येरु म्हणे महाराजा । ठाव दावितो चला ओजा । तेव्हां म्हणे शिष्य माझा । घेऊनि जावें सांगातीं ॥

**Transliteration**

**Yeru mhane Mahaaraajaa | Thaava daavito chalaa ojaa | Tevhaa mhane shishya maajhaa | Gheuni jaave saangaa-tee ||**

## Ovee 8

ऐसी कानिफा बोलतां मात । अवश्य म्हणे नृपनाथ । मग सच्छिष्य घेऊनि सांगात । तया ठायीं पातला ॥

**Transliteration**

**Aisee Kaaniphaa bolataa maatu | Avashya mhane nripanaathu | Maga sach-chishya gheuni saangaatu | Tayaa thaayee paatalaa ||**

## Ovee 9

ठाव दाखवूनि सच्छिष्यासी । पुन्हां आले शिबिरासी । शिष्य म्हणती त्या ठायासी । पाहूनि आलों महाराजा ॥

**Transliteration**

**Thaava daakhavuni sach-chishyaasee | Punhaa aale shibiraasee | Shishya mhanatee tyaa thaayaasee | Pahuni aalo Mahaaraajaa ||**

## Ovee 10

मग रायासी म्हणे कानिफानाथ । जालिंदर काढाया कोणती रीत । येरु म्हणे तुम्ही समर्थ । सकळ जाणते सर्वस्वीं ॥

**Transliteration**

**Maga raayaasee mhane Kaaniphaa-naathu | Jaalindara kaadhaayaa konatee reetu | Yeru mhane tumhee samarthu | Sakala jaanate sarvasvee ||**

## Ovee 11

बाळें आग्रहें करुं जाती । परी तयांचा निर्णय कैशा रीतीं । करावा हें तों नेणती निश्चितीं । सर्व संगोपी माता ती ॥

**Transliteration**

**Baale aagrahe karu jaatee | Paree tayaanchaa nirnaya kaishaa reetee | Karaavaa hey toh nenatee nishchitee | Sarva sangopee maataa tee ||**

## Ovee 12

तेवीं माता पिता गुरु । त्राता मारिता सर्वपारु । तरी कैसे रीती हा विचारु । आव्हानिजे महाराजा ॥

**Transliteration**

**Tevee maataa pitaa guru | Traataa maaritaa sarva-paaru | Taree kaise reetee haa vichaaru | Aavhaanije Mahaaraajaa ||**

## Ovee 13

ऐसें बोलतां नृपनाथ । मग बोलतां झाला गजकर्णसुत । तुझे रक्षावया जीवित । विचार माझा ऐकिजे ॥

Transliteration

**Aise bolataa nripanaathu | Maga bolataa jhaalaa Gajakarna-sutu | Tujhe rakshaavayaa jeevitu | Vichaara maajhaa aikije ||**

## Ovee 14

कनक रौप्य ताम्रवर्ण । पितळ लोह धातु पूर्ण । पांच पुतळे करुनि आण । तुजसमान हे राया ॥

Transliteration

**Kanaka raupya taamra-varnu | Pitala loha dhaatu poornu | Paancha putale karuni aanu | Tuja-samaana hey raayaa ||**

## Ovee 15

ऐसी आज्ञा करितांचि नाथ । प्रेरिले रायें ग्रामांत दूत । हेमकार लोहकारासहित । ताम्रकारका आणिलें ॥

Transliteration

**Aisee aajnyaa karitaanchi Naathu | Prerile raaye graamaanta dootu | Hema-kaara loha-kaaraa-sahitu | Taamra-kaarakaa aanile ||**

## Ovee 16

जे परम कुशल अति निगुती । लक्षूनि सोडिले हेराप्रती । धातु ओपूनि तयांचे हातीं । पुतळ्यांतें योजिलें ॥

Transliteration

**Je parama kushala ati nigutee | Lakshuni sodile heraa-pratee | Dhaatu opuni tayaanche haatee | Putalyaante yojile ||**

## Ovee 17

मग ते आपुले धीकोटी । पुतळे रचिती मेणावरती । नाथालागीं दावूनि दृष्टी । रसयंत्रीं ओतिले ॥

Transliteration

**Maga tey aapule dhee-kotee | Putale rachitee menaa-varatee | Naathaa-laagee daavuni drishtee | Rasa-yantree otile ||**

## Ovee 18

पाहोनि दिन अति सुदिन । मग नृपासह पुतळे घेवोन । पाहता झाला गुरुस्थान । विशाळबुद्धी कानिफा ॥

Transliteration

**Paahoni dina ati sudinu | Maga nripaasaha putale ghevonu | Paahataa jhaalaa guru-sthaanu | Vishaala-buddhee Kaaniphaa ||**

## Ovee 19

गरतीकांठीं आपण बैसोन । पुतळा ठेवोनि हेमवर्ण । राजाहातीं कुदळ देवोन । घाव घालीं म्हणतसे ॥

Transliteration

**Garatee-kaanthee aapana baisonu | Putalaa thevoni hema-varnu | Raajaa-haatee kudala devonu | Ghaava ghaalee mhanatase ||**

## Ovee 20

घाव घालितां परी लगबगां । पुसतां स्वामी नांव सांगा । सांगितल्यावरी अति वेगा । गरतीबाहेर निघे कीं ॥

Transliteration

**Ghaava ghaalitaa paree lagabagaan | Pusataa svaamee naava saangaa | Saangitalyaavaree ati vegaan | Garatee-baahera nighe kee ||**

## Ovee 21

ऐसें सांगोनि प्रथम रायातें । मग कुदळी दिधली हातातें । उपरी चिरंजीव प्रयोगातें । भाळी चर्चिली विभूती ॥

Transliteration

**Aise saangoni prathama raayaate | Maga kudalee didhalee haataate | Uparee chiranjeeva prayogaate | Bhaalee charchilee vibhootee ||**

## Ovee 22

पुतळा ठेवोनि मध्यगरतीं । मागें उभा राहिला नृपती । लवकर घाव घाली क्षिती । आंतूनि पुसे महाराज ॥

Transliteration

**Putalaa thevoni madhya-garatee | Maage ubhaa raahilaa nripatee | Lavakara ghaava ghaalee kshitee | Aantuni puse mahaaraaju ||**

## Ovee 23

कोणी येवोनि घालिती घाव । वेगीं वदे कां तयाचें नांव । नृप म्हणे मी राणीव । गोपीचंद असें कीं ॥

Transliteration

**Konee yevoni ghaalitee ghaavu | Vegee vade kaa tayaache naavu | Nripa mhane mee raaneevu | Gopeechanda ase kee ||**

## Ovee 24

रायें सांगतांचि नाम । निघाला होता गरतींतून । श्रीजालिंदराचे शापवचन । कणकप्रतिमे झगटलें ॥

Transliteration

**Raaye saangataanchi naamu | Nighaalaa hotaa garateen-tunu | Shree Jaalindaraache shaapa-vachanu | Kanaka-pratime jhagatale ||**

## Ovee 25

तीव्रशाप वैश्वानर । व्यापिलें कनकपुतळ्याचें शरीर । क्षण न लागतां महीवर । भस्म होवोनि पडियेलें ॥

### Transliteration

**Teevra-shaapa vaishvaanaru | Vyaapile kanaka-putalyaache shareeru | Kshana na laagataa mahee-varu | Bhasma hovoni padiyele ||**

## Ovee 26

भस्म होतां कनकप्रतिमा । दुसरा ठेविला उगमा । तयाही मागे नरेंद्रोत्तमा । पुन्हां गरति स्थापिलें ॥

### Transliteration

**Bhasma hotaa kanaka-pratimaa | Dusaraa thevilaa ugamaa | Tayaahee maage narendra-ottamaa | Punhaa garati sthaapile ||**

## Ovee 27

रौप्यवर्णी पुतळ्यामागें । राव उभा केला वेगें । पुन्हा विचारिलें सिद्धेयोगें । कोण आहेस म्हणवोनि ॥

### Transliteration

**Raupya-varnee putalyaa-maage | Raava ubhaa kelaa vege | Punhaa vichaarile siddhi-yoge | Kona aahesa mhanavoni ||**

## Ovee 28

पुन्हां सांगे नृप नांव । गरतीबाहेर वेगीं धांव । जालिंदरशापगौरव । जळ जळ खाक होवो कीं ॥

### Transliteration

**Punhaa saange nripa naavu | Garatee-baahera vegee dhaavu | Jaalindara-shapa-gauravu | Jala jala khaaka hovo kee ||**

## Ovee 29

ऐसें वदतां शापोत्तर । पुतळा पेटला वैश्वानरें । तोही होवोनि भस्मपर । महीलागीं मिरवला ॥

### Transliteration

**Aise vadataa shaapa-ottaru | Putalaa petalaa vaishvaanare | Tohee hovoni bhasmaparu | Mahee-laagee miravalaa ||**

## Ovee 30

मग तिसरा लोहपुतळा पूर्ण । तोही झाला शापें भस्म । चवथा पांचवा गति दुर्गम । त्याचिपरी पावला ॥

### Transliteration

**Maga tisaraa loha-putalaa poornu | Tohee jhaalaa shaape bhasmu | Chavathaa paanchavaa gati durgamu | Tyaachi-paree paavalaa ||**

## Ovee 31

यावरी त्या नृपनाथा । श्रीकानिफा झाला सांगता । मातें वदोनि नाम सर्वथा । नाथाप्रती सांगावें ॥

Transliteration

**Yavaree tyaa nripa-naathaa | Shree Kaaniphaa jhaalaa saangataa | Maate vadoni naama sarvathaa | Naathaa-pratee saangaave ||**

## Ovee 32

अवश्य म्हणे गौडपाळ । लवकरी भेदी अति सबळ । तो नाद ऐकूनि तपी केवळ । विचार करीत मानसीं ॥

Transliteration

**Avashya mhane gauda-paalu | Lavakaree bhedee ati sabalu | Toh naada aikuni tapee kevalu | Vichaara kareeta maanasee ||**

## Ovee 33

माझा क्रोध वडवानळ । जाळूनि टाकील ब्रह्मांड समग्र । तेथें वांचला त्रिलोचनकुमर । हें आश्चर्य वाटतें ॥

Transliteration

**Maajhaa krodha vadavaa-analu | Jaaluni taakeela Brahmaanda samagru | Tethe vaanchalaa trilochana-kumaru | Hey aashcharya vaatate ||**

## Ovee 34

कृतांताचे दाढेआंत । सांपडलिया सुटोनि जात । न शिवे वैश्वानर मृत्य । हें आश्चर्य वाटतसे ॥

Transliteration

**Kritaantaache daadhe-aantu | Saampadaliyaa sutoni jaatu | Na shive vaishvaanara mrityu | Hey aashcharya vaatatase ||**

## Ovee 35

महातक्षकानें दंश करुन । वांचवूं शके कोणी प्राण । केंवीं वांचला नृपनंदन । हें आश्चर्य वाटतें ॥

Transliteration

**Mahaa-takshakaane dansha karunu | Vaanchavoo shake konee praanu | Kevee vaanchalaa nripa-nandanu | Hey aashcharya vaatate ||**

## Ovee 36

परम संकट पाहोनी । प्राण उदित घेत हिरकणी । तो वांचूनि मिरवे जनीं । हें आश्चर्य वाटतसे ॥

Transliteration

**Parama sankata paahonee | Praana udita gheta hirakanee | Toh vaanchuni mirave janee | Hey aashcharya vaatatase ||**

## Ovee 37

उरग खगेंद्रा हातीं लागतां । परी न मरे भक्षण करितां । तेवीं झालें नृपनाथा । हेंचि आश्चर्य वाटतें ॥

**Transliteration**

**Uraga khagendraa haatee laagataa | Paree na mare bhakshana karitaa | Tevee jhaale nripa-naathaa | Henchi aashcharya vaatate ||**

## Ovee 38

कीं मूषक सांपडल्या मुखांत । त्यांतें कदा न ये मृत्य । तेवीं वांचला हा नृपनाथ । हेंचि आश्चर्य वाटतें ॥

**Transliteration**

**Kee mooshaka saampadalyaa mukhaantu | Tyaante kadaa na ye mrityu | Tevee vaanchalaa haa nripa-naathu | Henchi aashcharya vaatate ||**

## Ovee 39

सहज उभा पर्वतानिकटी । कडा तुटोनि पडला माथीं । त्यांत वाचलां ऐसें म्हणती । हेंचि आश्चर्य वाटतसे ॥

**Transliteration**

**Sahaja ubhaa parvataa-nikatee | Kadaa tutoni padalaa maathee | Tyaanta vaachalaa aise mhanatee | Henchi aashcharya vaatatase ||**

## Ovee 40

ऐसा विचार मनांत । करिता झाला जालिंदरनाथ । चित्तीं म्हणे त्या भगवंत । साह्य झाला रक्षणीं ॥

**Transliteration**

**Aisaa vichaara manaantu | Karitaa jhaalaa Jaalindaranaathu | Chittee mhane tyaa Bhagavantu | Saahya jhaalaa rakshanee ||**

## Ovee 41

तरी आतां असो ऐसें । वांचल्या अमर करुं त्यास । ऐसें विचारुनि चित्तास । मनीं गांठी दृढ धरिली ॥

**Transliteration**

**Taree aataa aso aise | Vaanchalyaa amara karu tyaasu | Aise vichaaruni chittaasu | Manee gaathee dridha dharilee ||**

## Ovee 42

येरीकडे कानिफनाथ । हुंकार नृपासी देत । तंव उभा स्वकरीं व्यक्त । लवकरी मही भेदीतसे ॥

**Transliteration**

**Yeree-kade Kaaniphanaathu | Hunkaara nripaasee detu | Tava ubhaa svakaree vyaktu | Lavakaree mahee bhedeetase ||**

## Ovee 43

लवकरी घाव कानीं उठता । श्रीजालिंदर होय पुसता । कोण आहेस अद्यापपर्यंत । घाव घालिसी महीतें ॥

**Transliteration**

**Lavakaree ghaava kaanee uthataa | Shree Jaalindara hoya pusataa | Kona aahesa adyaapa-paryantu | Ghaava ghaalisee maheete ||**

## Ovee 44

ऐकतां श्रीगुरुवचन । रायाआधीं गजकर्णनंदन । सांगूनि आपलें नामाभिधान । गोपीचंदाचें सांगतसे ॥

**Transliteration**

**Aikataa Shree Guru-vachanu | Raayaa-aadhee Gajakarna-nandanu | Sanguni aapale naama-abhidhaanu | Gopeechandaa-che saangatase ||**

## Ovee 45

म्हणे महाराजा तपोजेठी । मी बाळक कानिफा महीपाठी । पहावया चरण दृष्टीं । बहुत भुकेले चक्षू ते ॥

**Transliteration**

**Mhane Mahaaraajaa tapojethee | Mee baalaka Kaaniphaa mahee-paathee | Pahaavayaa charana drishtee | Bahuta bhukele chakshoo tey ||**

## Ovee 46

म्हणवोनि गोपीचंद नृपनाथ । तुम्हां काढावया उदित । ऐसी ऐकोनि स्वच्छिष्यमात । म्हणे अद्यापि नृप वांचला ॥

**Transliteration**

**Mhanavoni Gopeechanda nripa-naathu | Tumhaa kaadhaavayaa uditu | Aisee aikoni svach-chishya-maatu | Mhane adyaapi nripa vaanchalaa ||**

## Ovee 47

तरी आतां चिरंजीव । असो अर्कअवधी ठेव । अमरकांती सदैव भाव । जगामाजी मिरवो कां ॥

**Transliteration**

**Taree aataa chiranjeevu | Aso arkaavadhee thevu | Amara-kaantee sadaiva bhaavu | Jagaa-maajee miravo kaa ||**

## Ovee 48

ऐसें वदोनि जालिंदरनाथ । निजचक्षूनें पहावया सुत । बोलता झाला अति तळमळत । म्हणे महीतें विदारीं ॥

**Transliteration**

**Aise vadoni Jaalindaranaathu | Nija-chakshuune pahaavayaa sutu | Bolataa jhaalaa ati talamalatu | Mhane maheete vidaaree ||**

## Ovee 49

ऐसी आज्ञा होतांचि तेथें । मग काढिते झाले वरील लिदीतें । तंव ते मृत्तिका दशवर्षांत । महीव्यक्त झालीसे ॥

**Transliteration**

**Aisee aajnyaa hotaanchi tethe | Maga kaadhite jhaale vareela lideete | Tava tey mrittikaa dasha-varsha-antu | Mahee-vyakta jhaaleese ||**

## Ovee 50

मग कामाठी लावूनि नृपती । उकरिता झाला मही ती । वरील प्रहार वज्राप्रती । जावोनियां भेदलासे ॥

**Transliteration**

**Maga kaamaathee lavuni nripatee | Ukaritaa jhaalaa mahee tee | Vareela prahaara Vajraa-pratee | Jaavoniyaa bhedalaase ||**

## Ovee 51

मग तो नाद ऐकूनि नाथ । म्हणे आतां बसा स्वस्थ । मग जल्पोनि शक्रास्त्र । वज्रास्त्रातें काढिलें ॥

**Transliteration**

**Maga toh naada aikuni Naathu | Mhane aataa basaa svasthu | Maga jalponi Shakra-astru | Vajra-astraate kaadhile ||**

## Ovee 52

मग नाथ आणि गजकर्णनंदन । पाहते झाले उभय वदन । मग चित्तीं मोहाचे अपार जीवन । चक्षुद्वारे लोटलें ॥

**Transliteration**

**Maga Naatha aani Gajakarna-nandanu | Paahate jhaale ubhaya vadanu | Maga chittee mohaache apaara jeevanu | Chakshu-dvaare lotale ||**

## Ovee 53

मग गरतीबाहेर येवोनि नाथ । प्रेमें आलिंगला सुत । म्हणे बा प्रसंगे होतासी येथ । म्हणवोनि नृपनाथ वांचला ॥

**Transliteration**

**Maga garatee-baahera yevoni Naathu | Preme aalingalaa sutu | Mhane baa prasange hotaasee yethu | Mhanavoni nripa-naatha vaanchalaa ||**

## Ovee 54

परी गरतीबाहेर येतांचि नाथ । चरणीं लोटला नृपनाथ । मग त्यातें कवळोनि धरीत । मौळीं हात ठेवीतसे ॥

**Transliteration**

**Paree garatee-baahera yetaanchi Naathu | Charanee lotalaa nripa-naathu | Maga tyaate kavaloni dhareetu | Maulee haata theveetase ||**

## Ovee 55

म्हणे बाळा प्रळयाग्नी । त्यांत निघालासी वांचुनी । आतां जोंवरी शशितरणी । तोंवरी मिरवें महीतें ॥

**Transliteration**

**Mhane baalaa pralayaagnee | Tyaanta nighaalaasee vaanchunee | Aataa jovaree shashi-taranee | Tovaree mirave maheete ||**

## Ovee 56

यावरी त्रिलोचनकामिनी । मैनावती लोटली चरणीं । नेत्रीं अश्रुपात आणोनी । स्वामीलागीं बोलतसे ॥

**Transliteration**

**Yavaree trilochana-kaaminee | Mainaavatee lotalee charanee | Netree ashru-paata aanonee | Svaamee-laagee bolatase ||**

## Ovee 57

म्हणे महाराजा एकादश वर्षांत । मातें लोटली महातमरात । माझा अर्क गुरुनाथ । अस्ताचळीं पातलासे ॥

**Transliteration**

**Mhane Mahaaraajaa ekaadasha varsha-antu | Maate lotalee mahaata-maraatu | Maajhaa Arka guru-Naathu | Astaachalee paatalaase ||**

## Ovee 58

मित्रकुमुदिनी दीनवाणी । हुरहुर पाहे जैसी तरणी । कीं मम बाळकाची जननी । गेली कोठें कळेना ॥

**Transliteration**

**Mitra-kumudinee deena-vaanee | Hurahura paahe jaisee taranee | Kee mama baala-kaa-chee jananee | Gelee kothe kalenaa ||**

## Ovee 59

कीं मम वत्साची गाउली । कोणे रानीं दूर गेली । समूळ वत्साची आशा सांडिली । तिकडेचि गुंतली कैसेनि ॥

**Transliteration**

**Kee mama vatsaa-chee gaaulee | Kone raanee doora gelee | Samoola vatsaa-chee aashaa saandilee | Tikadechi guntalee kaiseni ||**

## Ovee 60

कां मम चकोराचा उडुगणपती । कैसा पावला अस्तगती । कीं मज चातकाचे अर्थी । ओस घन पडियेला ॥

**Transliteration**

**Kaa mama chakora-achaa uddagana-patee | Kaisaa paavalaa asta-gatee | Kee maja chaatakaache arthee | Osa ghana padiyelaa ||**

## Ovee 61

सदा वाटे हुरहुर जीवा । कीं लोभ्याचा चुकला द्रव्यठेवा । की अंधाची शक्ती काठी टेकावा । कोणें हरोनि नेलीसे ॥

**Transliteration**

**Sadaa vaate hurahura jeevaa | Kee lobhyaachaa chukalaa dravya-thevaa | Kee andhaachee shaktee kaathee tekaavaa | Kone haroni neleese ||**

## Ovee 62

ऐसे एकादश संवत्सर । मास गेले महाविकार । ऐसें बोलोनि नेत्रीं पूर । अश्रुघन वर्षतसे ॥

**Transliteration**

**Aise ekaadasha samvatsaru | Maasa gele mahaa-vikaaru | Aise boloni netree pooru | Ashru-ghana varshatase ||**

## Ovee 63

मग तियेसी हृदयीं धरोनि नाथ । स्वकरें नेत्राश्रु पुसीत । तीन्ही बाळकें धरोनि यथार्थ । माय हेलवे त्यामाजी ॥

**Transliteration**

**Maga tiyesee hridayee dharoni Naathu | Svakare netra-ashru puseetu | Teenhee baalake dharoni yathaarthu | Maaya helave tyaa-maajee ||**

## Ovee 64

गोपीचंदाचें मुख कुरवाळून । बोलता झाला अग्निनंदन । बा रे तुझें काय मन । इच्छीतसे मज सांग ॥

**Transliteration**

**Gopeechandaa-che mukha kuravaalunu | Bolataa jhaalaa Agni-nandanu | Baa re tujhe kaaya manu | Ichcheetase maja saangu ||**

## Ovee 65

राजवैभवा भोगावें । कीं आत्मीं समयोग्यते मिरवावें । कोणतें तुझें मनीं भावे । तैसा योग घडेल बा ॥

**Transliteration**

**Raaja-vaibhavaa bhogaave | Kee aatmee sama-yogyate miravaave | Konate tujhe manee bhaave | Taisaa yoga ghadela baa ||**

## Ovee 66

अशाश्वत शाश्वत दोन पद । राज्य वैराग्य मार्गभेद । तरी तुज आवडे तोचि वृंद । स्वीकारीं कां बाळका ॥

**Transliteration**

**Ashaashvata shaashvata dona padu | Raajya vairaagya maarga-bhedu | Taree tuja aavade tochi vrindu | Sveekaaree kaa baalakaa ||**

## Ovee 67

म्यां तूते केले अमरपणीं । परी तैसे नाहीं राजमांडणी । अनेक आले अभ्र दाटोनी । मृगजळासमान तें ॥

Transliteration

**Myaa toote kele amara-panee | Paree taise naahee raaja-maandanee | Aneka aale abhra daatonee | Mriga-jalaa-samaana tey ||**

## Ovee 68

बा रे संपत्ती अमरां कैसी । तेही आटेल काळवेळेसीं । दिसतें तितुकें वैभवासी । नाशिवंत आहे बा रे ॥

Transliteration

**Baa re sampattee amaraa kaisee | Tehee aatela kaala-velesee | Disate tituke vaibhavaasee | Naashivanta aahe baa re ||**

## Ovee 69

बा रे पूर्वी राज्य सांडून । कित्येक बैसले योग्यांत येवोन । परी तो योग सोडून । राज्यवैभवा नातळला ॥

Transliteration

**Baa re poorvee raajya sandunu | Kityeka baisale yogyaanta yevonu | Paree toh yoga sodunu | Raaja-vaibhavaa naatalalaa ||**

## Ovee 70

पाहें गाधिसुताचे वैभव । महीलागीं केवढें नांव । परी तो सोडूनि सकळ वैभव । योगक्रिया आचरला ॥

Transliteration

**Paahe Gaadhi-sutaache vaibhavu | Mahee-laagee kevadhe naavu | Paree toh soduni sakala vaibhavu | Yoga-kriyaa aacharalaa ||**

## Ovee 71

उत्तानपाद महीवरती । काय न्यून असे संपत्ती । परी सुताची कामशक्ती । वेगें जनीं दाटलीसे ॥

Transliteration

**Uttaanapaada mahee-varatee | Kaaya nyuna ase sampattee | Paree sutaachee kaama-shaktee | Vege janee daataleese ||**

## Ovee 72

तस्मात् अशाश्वत ओळखून । बा ते झाले सनातन । तरी आतां केउतें मन । इच्छितें तें मज सांगें ॥

Transliteration

**Tasmaatu ashaashvata olakhunu | Baa tey jhaale sanaatanu | Taree aataa ke-ute manu | Ichchite tey maja saange ||**

## Ovee 73

गोपीचंद विचार करी मनांत । राज्यवैभवीं सामर्थ्य गळित । अहा योगी जालिंदरनाथ । चिरंजीव मिरवतसे ॥

Transliteration

**Gopeechanda vichaara karee manaantu | Raaja-vaibhavee saamarthya galitu | Ahaa yogee Jaalindaranaathu | Chiranjeeva miravatase ||**

## Ovee 74

आज एकादश वर्षेपर्यंत । गरतगलित पचला योगीनाथ । जेणें यम शरणागत । पायांतळीं लोळतसे ॥

Transliteration

**Aaja ekaadasha varshe-paryantu | Garata-galita pachalaa yogee-Naathu | Jene yama sharanaaagatu | Paayaantalee lolatase ||**

## Ovee 75

जेणें कृतांत निर्बळ केला । तो राज्य मेळवूनि खळ ठेला । हेमकर्णे अशक्त झाला । परीस लोहाकारणें ॥

Transliteration

**Jene Kritaanta nirbala kelaa | Toh raajya melavuni khala thelaa | Hema-karne ashakta jhaalaa | Pareesa lohaa-kaarane ||**

## Ovee 76

सुरभी त्रैलोक्यकामना । पूर्ण करील क्षुधार्तवचना । ती स्वपोटा रानोंराना । शोधील काय तृणातें ॥

Transliteration

**Surabhee trailokya-kaamanaa | Poorna kareela kshudhaarta-vachanaa | Tee svapotaa raano-raanaa | Shodheela kaaya trinaate ||**

## Ovee 77

ब्रह्मांडावरी जयाची सत्ता । तो कोणे अर्थी दरिद्रता । भोगील काय ऐसी वार्ता । श्लाघ्य दिसेना बोलाया ॥

Transliteration

**Brahmaandaa-varee jayaachee sattaa | Toh kone arthee daridrataa | Bhogeela kaaya aisee vaartaa | Shlaaghya disenaa bolaayaa ||**

## Ovee 78

तरी तें वैराग्य भाग्यसदन । साध्य करावें कार्ये मनें । ऐसा पश्चाताप दारुण । चित्तामाजी डवरला ॥

Transliteration

**Taree tey vairaagya bhaagya-sadanu | Saadhya karaave kaarye mane | Aisaa pashchaataapa daarunu | Chittaa-maajee davaralaa ||**

## Ovee 79

मग म्हणे गुरुमहाराज । इंधनीं अग्नि होतां सज्ज । तेवीं विधानचि तैसे विराजे । पावका स्पर्श झालिया ॥

Transliteration

**Maga mhane guru-Mahaaraaju | Indhanee agni hotaa sajju | Tevee vidhaanachi taise viraaje | Paavakaa sparsha jhaaliyaa ||**

## Ovee 80

तरी आतां सरतें पुरतें । आपुल्यासमान करा मातें । आळीभृंगन्यायमतें । करुनि मिरवें महीसी ॥

Transliteration

**Taree aataa sarate purate | Aapulyaa-samaana karaa maate | Aalee-bhringanyaaya-mate | Karuni mirave maheesee ||**

## Ovee 81

ऐकोनि दृढोत्तर वचन । श्रीगुरु स्वकरातें उचलोन । पृष्ठी थापटी वाचे वचन । गाजी गाजी म्हणतसे ॥

Transliteration

**Aikoni dridhottara vachanu | Shree Guru svakaraate uchalonu | Prishthee thaapatee vaache vachanu | Gaajee gaajee mhanatase ||**

## Ovee 82

मग वरदहस्त स्पर्शोनि मौळीं । सकळ देहातें कृपें न्याहाळीं । कर्णीं ओपूनि मंत्रावळी । स्वनाथमार्गीं मिरवला ॥

Transliteration

**Maga varadahasta sparshoni maulee | Sakala dehaate kripe nyaahaalee | Karnee opuni mantra-aavalee | Sva-Naatha-maargee miravalaa ||**

## Ovee 83

ऐसें होतां अंग लिप्त । मग दिसूनि आलें अशाश्वत । काया माया दृश्य पदार्थ । विनय चित्तीं मिरवले ॥

Transliteration

**Aise hotaa anga liptu | Maga disuni aale ashaashvatu | Kaayaa maayaa drishya padaarthu | Vinaya chittee miravale ||**

## Ovee 84

मग वेटतरुचें दुग्ध काढून । जटा वळी राजनंदन । त्रिसट कौपीन परिधानून । कर्णीं मुद्रा परिधानी ॥

Transliteration

**Maga veta-taruche dugdha kaadhunu | Jataa valee raaja-nandanu | Trisata kaupeena paridhaanunu | Karnee mudraa paridhaanee ||**

## Ovee 85

शैली कंथा परिधानूनी । शिंगीनाद गाजवीं भुवनीं । कुबडी फावडी कवळूनि पाणी । नाथपणीं मिरवला ॥

Transliteration

**Shailee kanthaa paridhaanuunee | Shingee-naada gaajavee bhuvanee | Kubadee phaavadee kavaluni paanee | Naatha-panee miravalaa ||**

## Ovee 86

भस्मझोळी कवळूनि कक्षेंत । आणि द्वितीय झोळी भिक्षार्थ । हातीं कवळूनि नागनाथ । जगामाजी मिरवला ॥

Transliteration

**Bhasma-jholee kavaluni kakshentu | Aani dviteeya jholee bhikshaarthu | Haatee kavaluni naaga-Naathu | Jagaa-maajee miravalaa ||**

## Ovee 87

परी हा वृत्तांत सकळ गांवांत । अंत:पुरादिकीं झाला श्रुत । श्रुत होतांचि अपरिमित । शोकसिंधु उचंबळला ॥

Transliteration

**Paree haa vrittaanta sakala gaavaantu | Antah-puraadikee jhaalaa shrutu | Shruta hotaanchi aparimitu | Shoka-sindhu uchambalalaa ||**

## Ovee 88

एकचि झाला हाहाकार । रुदन  करितां लोटला पूर । स्त्रिया धरणीसी टाकिती शरीर । मुखीं मृत्तिका घालिती ॥

Transliteration

**Ekachi jhaalaa haa-haa-kaaru | Rudana karitaa lotalaa pooru | Striyaa dharaneesee taakitee shareeru | Mukhee mrittikaa ghaalitee ||**

## Ovee 89

मैनावतीसी शिव्या देत । म्हणती हिनेंचि केला सर्वस्वीं घात । अहा अहा नृपनाथ । महीं कोठे पहावा ॥

Transliteration

**Mainaavateesee shivyaa detu | Mhanatee hinenchi kelaa sarvasvee ghaatu | Ahaa ahaa nripanaathu | Mahee kothe pahaavaa ||**

## Ovee 90

आठवूनि रायाचे विशाल गुण । भूमीवरी लोळती रुदन करुन । मूर्च्छागत होऊन प्राण । सोडूं पाहती रुदनांत ॥

Transliteration

**Aathavuni raayaache vishaala gunu | Bhoomee-varee lolatee rudana karunu | Moorchchaagata houni praanu | Sodoo paahatee rudana-antu ||**

## Ovee 91

अहा हें राजवैभव । कैसी आली विवशी माव । अहा सुखाचा सकळ अर्णव । वडवानळें प्राशिला ॥

**Transliteration**

**Ahaa hey raajya-vaibhavu | Kaisee aalee vivashee maavu | Ahaa sukha-achaa sakala arnavu | Vadavaanale praashilaa ||**

## Ovee 92

अहा रायाचें बोलणें कैसें । कधीं दुखविलें नाहीं मानस । आमुचे वाटेल ते इच्छेस । राव पुरवी आवडीनें ॥

**Transliteration**

**Ahaa raayaache bolane kaise | Kadhee dukhavile naahee maanasu | Aamuche vaatela tey ichchesu | Raava puravee aavadeene ||**

## Ovee 93

एक म्हणे सांगूं काय । रायें वेष्टिलें चित्त मोहें । म्लानवदन पाहोनि राय । हृदयीं कवळी मोहानें ॥

**Transliteration**

**Eka mhane saangoo kaayu | Raaye veshtile chitta mohe | Mlaanavadana paahoni raayu | Hridayee kavalee mohaane ||**

## Ovee 94

म्हणे बाई मुखातें कुरवाळून । परम प्रीतीनें घेत चुंबन । अति स्नेहानें अर्थ पुरवून । मनोरथ पुरवी माझे गे ॥

**Transliteration**

**Mhane baaee mukhaate kuravaalunu | Parama preeteene gheta chumbanu | Ati snehaane artha puravunu | Mano-ratha puravee maajhe ge ||**

## Ovee 95

ऐसें म्हणूनि आरंबळत । एकसरां शब्द करीत । एक म्हणे वो बाई मात । काय परी सांग रायाची ॥

**Transliteration**

**Aise mhanuni aarambalatu | Ekasaraa shabda kareetu | Eka mhane vo baaee maatu | Kaaya paree saangu raayaa-chee ||**

## Ovee 96

अगे वत्सालागीं जैशी गाय । क्षणिक विसंबूं कदा न पावे । तेवीं क्षणाक्षणां येऊनि राय । वदन पाहे माझें गे ॥

**Transliteration**

**Aghe vatsaa-laagee jaishee gaayu | Kshanika visamboo kadaa na paave | Tevee kshanaak-shanaa yeuni raayu | Vadana paahe maajhe ge ||**

## Ovee 97

एक म्हणे अर्थ पोटीं । किती सांगूं राजदृष्टी । वांकुडा केश कंबरीथाटीं । पडतां सांवरी हस्तानें ॥

**Transliteration**

**Eka mhane artha potee | Kitee saangoo raaja-drishtee | Vaankudaa kesha kambaree-thaatee | Padataa saavaree hastaane ||**

## Ovee 98

अगे कुंकुमरेषा वांकडी होत । ती सांवरी नृपनाथ । मायेहूनि अधिक आतिथ्य । माझें करीत होता गे ॥

**Transliteration**

**Aghe kunkuma-reshaa vaankadee hotu | Tee saavaree nripa-naathu | Maaye-huni adhika aatithyu | Maajhe kareeta hotaa ge ||**

## Ovee 99

ऐसें म्हणूनि धरणीं अंग । धडाडूनि टाकिती सुभाग्य । म्हणती विधात्या बरवा भांग । निजभाळीं रेखिला कीं ॥

**Transliteration**

**Aise mhanuni dharanee angu | Dhadaa-duni taakitee subhaagyu | Mhanatee vidhaatyaa baravaa bhaangu | Nija-bhaalee rekhilaa kee ||**

## Ovee 100

मस्तक धरणीवरी आपटिती । धडधडां हस्तें हृदय पिटीती । महीं गडबडूनि पुन्हां उठती । पुन्हां सांडिती शरीरातें ॥

**Transliteration**

**Mastaka dharanee-varee aapatitee | Dhada-dhadaa haste hridaya piteetee | Mahee gadabaduni punhaa uthatee | Punhaa saanditee sharee-raate ||**

## Ovee 101

म्हणती राया तुजविण । आतां कोण करील संगोपन । आतां आमुचे सकळ प्राण । परत्र देशांत जातील हो ॥

**Transliteration**

**Mhanatee raayaa tuja-vinu | Aataa kona kareela sangopanu | Aataa aamuche sakala praanu | Paratra deshaanta jaateela ho ||**

## Ovee 102

ऐसें म्हणूनि आरंबळती । अट्टाहासें हृदय पिटीती । मृत्तिका घेऊनि मुखीं घालिती । केश तोडिती तटतटां ॥

**Transliteration**

**Aise mhanuni aaram-balatee | Attaahaase hridaya piteetee | Mrittikaa gheuni mukhee ghaalitee | Kesha toditee tata-tataa ||**

## Ovee 103

म्हणती अहा राया तीनवेळ । शय्येहूनि उठूनि पाजिसी जळ । ऐसा कनवाळू असूनि निर्मळ । सोडूनि कैसा जासी रे ॥

Transliteration

**Mhanatee ahaa raayaa teena-velu | Shayye-huni uthuni paajisee jalu | Aisaa kanavaaloo asuni nirmalu | Soduni kaisaa jaasee re ||**

## Ovee 104

अहा राया शयनीं निजतां । उदर चापसी आपुल्या हाता । रिक्त लागतां उठोनि तत्त्वतां । भोजन घालीत होतासी ॥

Transliteration

**Ahaa raayaa shayanee nijataa | Udara chaapasee aapulyaa haataa | Rikta laagataa uthoni tattvataa | Bhojana ghaaleeta hotaasee ||**

## Ovee 105

ऐसा कनवाळू तूं मनीं । आतां कैसा जासी सोडूनी । ऐसें म्हणोनि शरीर धरणीं । धडाडूनि टाकिलें ॥

Transliteration

**Aisaa kanavaaloo too manee | Aataa kaisaa jaasee soduunee | Aise mhanoni shareera dharanee | Dhadaaduni taakile ||**

## Ovee 106

म्हणे रायाचें स्वरुप । पाहतांचि पुरतसे कंदर्प । तरी त्या स्वरुपाचा झाला लोप । कोठें पाहूं महाराजा ॥

Transliteration

**Mhane raayaache svarupu | Paahataanchi puratase Kandarpu | Taree tyaa sva-rupa-achaa jhaalaa lopu | Kothe paahoo Mahaaraajaa ||**

## Ovee 107

एक म्हणे नोहे भर्ता । प्रत्यक्ष होती आमुची माता । कैसी सांडूनि जात आतां । निढळवाणी पाडसा ॥

Transliteration

**Eka mhane nohe bhartaa | Pratyaksha hotee aamuchee maataa | Kaisee sanduni jaata aataa | Nidhalavaanee paadasaa ||**

## Ovee 108

एक म्हणे माझी हरिणी । कैसी पाडसा जात सोडूनि । एक म्हणे माझी कूर्मिणी । कृपादृष्टी आवगतली ॥

Transliteration

**Eka mhane maajhee harinee | Kaisee paadasaa jaata soduni | Eka mhane maajhee koorminee | Kripaa-drishtee aavagatalee ||**

## Ovee 109

एक म्हणे गज मीनांचे बळ । कैसें आटलें अब्धीचें जळ । दु:खार्काची झळाळ । साहवेना वो माये ॥

Transliteration

**Eka mhane gaja meenaanche balu | Kaise aatale abdheeche jalu | Duhkhaarkaachee jhalaalu | Saahavenaa vo maaye ||**

## Ovee 110

एक म्हणे माउली माझी । स्नेहाचा पान्हा पाजी । वियोगकाननीं चुकर आजी । कैसी झाली दैवानें ॥

Transliteration

**Eka mhane maaulee maajhee | Sneha-achaa paanhaa paajee | Viyoga-kaananee chukara aajee | Kaisee jhaalee daivaane ||**

## Ovee 111

एक म्हणे आमुची पक्षिणी । अंडजासमान पाळिलें धरणी । आतां चंचुस्नेहेंकरोनी । कोण ओपील ग्रासातें ॥

Transliteration

**Eka mhane aamuchee pakshinee | Andajaa-samaana paalile dharanee | Aataa chanchu-snehen-karonee | Kona opeela graasaate ||**

## Ovee 112

एक म्हणे मज चातकाकारण । भरतां नोहे गे अंबुदस्थान । परम स्नेहाचें पाजितां जीवन । आजि ओस कैसा झाला गे ॥

Transliteration

**Eka mhane maja chaatakaa-kaaranu | Bharataa nohe ge ambuda-sthaanu | Parama snehaache paajitaa jeevanu | Aaji osa kaisaa jhaalaa ge ||**

## Ovee 113

ऐसें म्हणोनि आरंबळती । एकमेकींचे गळां पडती । रडती पडती पुन्हा उठती । आरंबळती आक्रोशें ॥

Transliteration

**Aise mhanoni aarambalatee | Ekamekeenche galaa padatee | Radatee padatee punhaa uthatee | Aarambalatee aakroshe ||**

## Ovee 114

ऐसा आकांत अंत:पुरांत । येरीकडे जालिंदरनाथ । राया गोपीचंदा सांगत । तपालागीं जाईं कां ॥

Transliteration

**Aisaa aakaanta antah-puraantu | Yeree-kade Jaalindara-naathu | Raayaa Gopeechandaa saangatu | Tapaa-laagee jaaee kaa ||**

## Ovee 115

परी राया ऐक मात । सुरत्नपणाचा पाहों हेत । तुझ्या स्त्रिया अठरा शत । भिक्षा मागें तयांपासीं ॥

Transliteration

**Paree raayaa aika maatu | Suratna-panaachaa paaho hetu | Tujhyaa striyaa atharaa shatu | Bhikshaa maage tayaam-paasee ||**

## Ovee 116

अलक्ष आदेश निरंजन । ऐसा सवाल मुखें वदोन । अंतःपुरांत संचार करोन । भिक्षा मागें बाळका तूं ॥

Transliteration

**Alaksha aadesha niranjanu | Aisaa savaala mukhe vadonu | Antah-puraanta sanchaara karonu | Bhikshaa maage baalakaa too ||**

## Ovee 117

शिंगीनाद वाजवूनि हातीं । भिक्षा दे माई वदोनि उक्ती । ऐशापरी भेटोनि युवती । तपालागीं जाईं कां ॥

Transliteration

**Shingee-naada vaajavuni haatee | Bhikshaa de maaee vadoni uktee | Aishaa-paree bhetoni yuvatee | Tapaa-laagee jaaee kaa ||**

## Ovee 118

मग अवश्य म्हणोनि नृपनाथ । संचार करी अंतःपुरांत । अलक्ष निरंजन मुखें वदत । माई भिक्षा दे म्हणतसे ॥

Transliteration

**Maga avashya mhanoni nripa-naathu | Sanchaara karee antah-puraantu | Alaksha Niranjana mukhe vadatu | Maaee bhikshaa de mhanatase ||**

## Ovee 119

तें पाहूनि त्या युवती । महाशोकाब्धींत उडी घालिती । एकचि कोल्हाळ झाला क्षितीं । नाद ब्रह्मांडीं आदळतसे ॥

Transliteration

**Tey pahuni tyaa yuvatee | Mahaa-shoka-abdheenta udee ghaalitee | Ekachi kolhaala jhaalaa kshitee | Naada Brahmaandee aadalatase ||**

## Ovee 120

एक हातें तोडिती केशांतें । एक मृत्तिका घालिती मुखांत । एक म्हणे दाही दिशा ओस दिसत । दाही विभाग झाल्यानें ॥

Transliteration

**Eka haate toditee keshaante | Eka mrittikaa ghaalitee mukhaantu | Eka mhane daahee dishaa osa disatu | Daahee vibhaaga jhaalyaane ||**

## Ovee 121

एक धुळींत लोळती । एक उठूनि पुन्हां पडती । एक हृदय पिटोनि हस्ती । आदळिती मस्तकें ॥

**Transliteration**

**Eka dhuleenta lolatee | Eka uthuni punhaa padatee | Eka hridaya pitoni hastee | Aadalitee mastake ||**

## Ovee 122

एक पाहोनि रायाचें स्वरुप । म्हणती अहाहा कैसा भूप । सवितारुपी झाला दीप । खद्योतपणीं दिसतसे ॥

**Transliteration**

**Eka paahoni raayaache svarupu | Mhanatee ahaahaa kaisaa bhoopu | Savitaa-rupee jhaalaa deepu | Khadyota-panee disatase ||**

## Ovee 123

अहाहा राव वैभवार्णव । कैसा दिसतो दीनभाव । कीं मेरुमांदार सोडूनि सर्व । मशक दृष्टीं ठसावला ॥

**Transliteration**

**Ahaa-haa raava vaibhava-arnavu | Kaisaa disato deena-bhaavu | Kee Meru-maandaara soduni sarvu | Mashaka drishtee thasaavalaa ||**

## Ovee 124

अहा राय हस्तेंकरुन । अपार याचकां वांटी धन । आतां कक्षेंत झोळी घालून । मागें कण घरोघरीं ॥

**Transliteration**

**Ahaa raaya hasten-karunu | Apaara yaachakaa vaantee dhanu | Aataa kakshenta jholee ghaalunu | Maage kana gharo-gharee ||**

## Ovee 125

ऐसें म्हणोनि आरंबळती । धरणीवरी अंग टाकिती । पुन्हां उठोनि अवलोकिती । म्हणती अहा काय झालें ॥

**Transliteration**

**Aise mhanoni aarambalatee | Dharanee-varee anga taakitee | Punhaa uthoni avalokitee | Mhanatee ahaa kaaya jhaale ||**

## Ovee 126

असो नृप तो अंतःपुरांगणीं । आदेश निरंजन वदे वाणी । मुख्य नायिका लुमावंती राणी । रायापासीं पातली ॥

**Transliteration**

**Aso nripa toh antah-puraanganee | Aadesha Niranjana vade vaanee | Mukhya naayikaa Lumaavantee raanee | Raayaa-paasee paatalee ||**

## Ovee 127

मुखचंद्र गळे बोलूनी । नयनीं अश्रु अपार जीवनीं । रायालागीं पाळा घालूनी । वेष्टूनियां बोलती त्या ॥

**Transliteration**

**Mukha-chandra gale boluunee | Nayanee ashru apaara jeevanee | Raayaa-laagee paalaa ghaaluunee | Veshtuniyaa bolatee tyaa ||**

## Ovee 128

तिचे मागें चंपिका कारंती । उठोनि येतात मागें समस्ती । राजस्त्रिया अट्टाहास करिती । धांव घेती मागें लगबगां ॥

**Transliteration**

**Tiche maage Champikaa kaarantee | Uthoni yetaata maage samastee | Raaja-striyaa attaahaasa karitee | Dhaava ghetee maage lagabagaa ||**

## Ovee 129

म्हणती राया असो कैसें । घडूनि आलें ईश्वरसत्तेसें । परी येथेंचि राहूनि पूर्ण योगास । संपादिंजे महाराजा ॥

**Transliteration**

**Mhanatee raayaa aso kaise | Ghaduni aale Eeshvara-sattese | Paree yethenchi rahuni poorna yogaasu | Sampaadinje Mahaaraajaa ||**

## Ovee 130

आम्हां दरिद्रियांचें स्वरुपमांदुस । लोपवूं नका सहसा महीस । आम्ही तुम्हांविण दिसतों ओस । प्राणाविण शरीर जैसें ॥

**Transliteration**

**Aamhaa daridriyaanche svarupa-maandusu | Lopavoo nakaa sahasaa maheesu | Aamhee tumhaa-vina disato osu | Praanaavina shareera jaise ||**

## Ovee 131

हे राया आम्ही स्त्रिया कोटी । परम अंध महीपाठीं । तरी आमुची सबळ काठी । टेंका हरुं नका जी ॥

**Transliteration**

**Hey raayaa aamhee striyaa kotee | Parama andha mahee-paathee | Taree aamuchee sabala kaathee | Tenkaa haru nakaa jee ||**

## Ovee 132

तरी येथेंचि योग आचरावा । आम्ही न छळूं विषयभावा । परी तव स्वरुपाचि ठेवा । पाहूनि तो शांत करुं कीं ॥

**Transliteration**

**Taree yethenchi yoga aacharaavaa | Aamhee na chaloo vishaya-bhaavaa | Paree tava svarupaa-chi thevaa | Pahuni toh shaanta karu kee ||**

## Ovee 133

जैसें जीर्ण कडतर । परी म्हणावा वैभवी थोर छत्र । तेवीं तव आश्रयीं सर्व पवित्र । वैभवमंडण आम्हांसी ॥

Transliteration

**Jaise jeerna kadataru | Paree mhanaavaa vaibhavee thora chatru | Tevee tava aashrayee sarva pavitru | Vaibhava-mandana aamhaansee ||**

## Ovee 134

तरी मानेल तेथें पर्णकुटिका । बांधूनि देऊं जडितहाटका । आम्ही बारा सोळा शत बायका । सेवा करुं आदरानें ॥

Transliteration

**Taree maanela tethe parna-kutikaa | Baandhuni deoo jadita-haatakaa | Aamhee baaraa solaa shata baayakaa | Sevaa karu aadaraane ||**

## Ovee 135

सुवर्णे शिंगी देऊं मढवूनी । आणि रत्नबिकी शैल्या परिधानून । कनकचिरी कंथा घालून । हें सुखसंपन्न भोगावें ॥

Transliteration

**Suvarne shingee deoo madha-vuunu | Aani ratnabikee shailyaa paridhaanunu | Kanaka-chiree kanthaa ghaalunu | Hey sukha-sampanna bhogaave ||**

## Ovee 136

मुक्तरत्नें हिरे माणिक । संगीत करुनि हाटकीं देख । त्यातें भूषणमुद्रा अलौकिक । हें सुखसंपन्न भोगावें ॥

Transliteration

**Mukta-ratne hire maaniku | Sangeeta karuni haatakee dekhu | Tyaate bhooshana-mudraa alauliku | Hey sukhasampanna bhogaave ||**

## Ovee 137

कनकचीर तेजविपुल । शेले शाली शाला दुशाल । स्वीकारा सांडूनि मृगछाल । हें सुखसंपन्न भोगावें ॥

Transliteration

**Kanaka-cheera teja-vipulu | Shele shaalee shaalaa dushaalu | Sveekaaraa sanduni mriga-chaalu | Hey sukha-sampanna bhogaave ||**

## Ovee 138

लोड तिवासे मंचक सुगम । गादी तोषक अति गुल्म । तरी भस्म सन्निधीकरुन । हें सुखसंपन्न भोगावें ॥

Transliteration

**Loda tivaase manchaka sugamu | Gaadee toshaka ati gulmu | Taree bhasma sannidhee-karunu | Hey sukha-sampanna bhogaave ||**

## Ovee 139

भिक्षातुकडे सूक्ष्म कठिण । त्यजूनि सेवीं षड्रसान्न । घृत दुग्ध दहि पक्वान्न । हें सुखसंपन्न भोगावें ॥

Transliteration

**Bhikshaa-tukade sookshma kathinu | Tyajuni sevee shad-rasa-annu | Ghrita dugdha dahi pakvaannu | Hey sukha-sampanna bhogaave ||**

## Ovee 140

एकट सेवीं त्यजीं कानन । दासदासी सेवकजन । सेवा करितां षोडशोपचारानें । हें सुखसंपन्न भोगावें ॥

Transliteration

**Ekata sevee tyajee kaananu | Daasa-daasee sevaka-janu | Sevaa karitaa shodasha-upachaaraane | Hey sukha-sampanna bhogaave ||**

## Ovee 141

चुवा चंदन अर्गजासुवास । मार्जन करुं तव देहास । धिक्कारुनि तृणासनास । हें सुखसंपन्न भोगावें ॥

Transliteration

**Chuvaa chandana argajaa-suvaasu | Maarjana karu tava dehaasu | Dhikkaaruni trina-aasanaasu | Hey sukha-sampanna bhogaave ||**

## Ovee 142

हत्ती घोडे शिबिका सदन । टाकूनि कराल तीर्थाटनी । परी चालला तें दुःख त्यजून । हें सुखसंपन्न भोगावें ॥

Transliteration

**Hattee ghode shibikaa sadanu | Taakuni karaala teertha-atanee | Paree chaalalaa tey duhkha tyajunu | Hey sukha-sampanna bhogaave ||**

## Ovee 143

महाल चोटक संगीत रंगीत । तें सांडूनि विपिनीं पडाल दुःखित । तरी तें त्यजूनि रहा येथ । हें सुखसंपन्न भोगावें ॥

Transliteration

**Mahaala chotaka sangeeta rangeetu | Tey sanduni vipinee padaala duhkhitu | Taree tey tyajuni rahaa yethu | Hey sukha-sampanna bhogaave ||**

## Ovee 144

छत्र चामरें प्रजा अंकित । त्यजूनि फिराल अरण्यांत । एकटपणीं त्यजूनि रहा येथ । हें सुखसंपन्न भोगावें ॥

Transliteration

**Chatra chaamare prajaa ankitu | Tyajuni phiraala aranyaantu | Ekatapanee tyajuni rahaa yethu | Hey sukha-sampanna bhogaave ||**

## Ovee 145

मृगाक्षी खंजीरपद्मनयनी । पदचुरिती कोमलपाणीं । तरी तृणांकुरशयन त्यजूनि । हें सुखसंपन्न भोगावें ॥

Transliteration

**Mriga-akshee khanjeera-padma-nayanee | Padac-huritee komala-paanee | Taree trina-ankura-shayana tyajuni | Hey sukha-sampanna bhogaave ||**

## Ovee 146

चंद्राननी गजगामिनी । बोलती संवाद रसाळ वाणी । तरी यांचा त्याग करोनी । हें सुखसंपन्न भोगावें ॥

Transliteration

**Chandra-aananee gaja-gaaminee | Bolatee samvaada rasaala vaanee | Taree yaanchaa tyaaga karonee | Hey sukha-sampanna bhogaave ||**

## Ovee 147

ऐशा स्त्रिया संवादती । परी कोप चढला रायाच्या चित्तीं । दूर हो लंडी म्हणोनि उक्ति । धिक्कारीत तयांतें ॥

Transliteration

**Aishaa striyaa samvaadatee | Paree kopa chadhalaa raayaa-chyaa chittee | Doora ho landee mhanoni ukti | Dhikkaa-reeta tayaante ||**

## Ovee 148

परी त्या मोहें वेष्टूनि बोलत । राया एकटें पडावें अरण्यांत । तुम्हांसवें बातचीत । कोण करील महाराजा ॥

Transliteration

**Paree tyaa mohe veshtuni bolatu | Raayaa ekate padaave aranyaantu | Tumhaan-save baata-cheetu | Kona kareela Mahaaraajaa ||**

## Ovee 149

येरी म्हणे अरण्यपोटीं । सिंगी सारंगी करील गोष्टी । स्त्रिया म्हणती आसनदृष्टी । वसन कैंचें हो तेथे ॥

Transliteration

**Yeree mhane aranya-potee | Singee saarangee kareela goshtee | Striyaa mhanatee aasana-drishtee | Vasana kainche ho tethe ||**

## Ovee 150

राव म्हणे मही आसन । अंबरासारखे असे ओढवण । स्त्रिया म्हणती शयनीं कोण । निजेल तुमच्या सांगातीं ॥

Transliteration

**Raava mhane mahee aasanu | Ambaraa-saarakhe ase odha-vanu | Striyaa mhanatee shayanee konu | Nijela tumachyaa saangaa-tee ||**

## Ovee 151

येरी म्हणे कुबडी फावडी । शयन करितील दोन्ही थडी । स्त्रिया म्हणती शैत्य हुडहुडी । कोण निघारीं सांगावें ॥

Transliteration

**Yeree mhane kubadee phaavadee | Shayana kariteela donhee thadee | Striyaa mhanatee shaitya huda-hudee | Kona nighaaree saangaave ||**

## Ovee 152

येरी म्हणे अचल धुनी । पेटवा घेईल पंचाग्नी । ते सबळ शीतनिवारणीं । होतील योग साधावया ॥

Transliteration

**Yeree mhane achala dhunee | Petavaa ghaeela panchaagnee | Tey sabala sheeta-nivaaranee | Hoteela yoga saadhaavayaa ||**

## Ovee 153

स्त्रिया म्हणती अलौकिक । तेथें कोठें परिचारक लोक । राज्यासनीं पदार्थ कवतुक । देत होते आणूनियां ॥

Transliteration

**Striyaa mhanatee alaukiku | Tethe kothe pari-chaaraka loku | Raajya-asanee padaartha kavatuku | Deta hote aanuniyaa ||**

## Ovee 154

येरी म्हणे व्याघ्रांबर । आसन विराजूं वज्रापर । मग धांव घेती नारीनर । कौतुकपदार्थ मिरवावया ॥

Transliteration

**Yeree mhane vyaaghra-ambaru | Aasana viraajoo vajraa-paru | Maga dhaava ghetee naaree-naru | Kautuka-padaartha miravaavayaa ||**

## Ovee 155

स्त्रिया म्हणती मोहव्यक्त । कोणतीं असती मायावंत । माय बाप भगिनी सुत । अरण्यांत कैंचीं ही ॥

Transliteration

**Striyaa mhanatee moha-vyaktu | Konatee asatee maayaa-vantu | Maaya baapa bhaginee sutu | Aranyaanta kainchee hee ||**

## Ovee 156

येरी म्हणे विश्वरुप । घरघर आई घरघर बाप । इष्टमित्र भगिनी गोतरुप । शिष्य साधक मिरवती ॥

Transliteration

**Yeree mhane vishva-rupu | Ghara-ghara aaee gharaghara baapu | Ishta-mitra bhaginee gota-rupu | Shishya saadhaka miravatee ||**

## Ovee 157

स्त्रिया म्हणती षड्रसादि अन्नें । विपीनीं मिळतील कोठून । येरी म्हणे जीं फळें सुगम । षड्रसादि असती तीं ॥

Transliteration

**Striyaa mhanatee shadrasa-adi annu | Vipeenee milateela kothunu | Yeree mhane jee phale sugamu | Shad-rasa-adi asatee tee ||**

## Ovee 158

स्त्रिया म्हणती वेंचाया साधन । विपीनीं मिळेल जी कोठून । येरी म्हणे ब्रह्मरुपानें । घेऊं देऊं वेव्हारासी ॥

Transliteration

**Striyaa mhanatee venchaayaya saadhanu | Vipeenee milela jee kothunu | Yeree mhane Brahma-rupaane | Gheoo deoo vevhaaraasee ||**

## Ovee 159

स्त्रिया म्हणती फाटल्या कौपीन । पुनः मिळेल ती कोठून । येरी म्हणे इंद्रियदमन । विषयीं कांसोटी घालूं कीं ॥

Transliteration

**Striyaa mhanatee phaatalyaa kaupeenu | Punah milela tee kothunu | Yeree mhane indriya-damanu | Vishayee kaansotee ghaaloo kee ||**

## Ovee 160

स्त्रिया म्हणती फाटल्या कंथां । ते कोठूनि मिळेल जी समर्था । येरी म्हणे योग आचरतां । दिव्य कंथा होईल ॥

Transliteration

**Striyaa mhanatee phaatalyaa kanthaa | Tey kothuni milela jee samarthaa | Yeree mhane yoga aacharataa | Divya kanthaa hoeelu ||**

## Ovee 161

स्त्रिया म्हणती सिंगी सारंगी । फुटूनि गेलिया प्रसंगीं । मग गोष्टी करावयाची तरंगी । कोण आहे तुम्हांपाशीं ॥

Transliteration

**Striyaa mhanatee singee saarangee | Phutuni geliyaa prasangee | Maga goshtee karaavayaa-chee tarangee | Kona aahe tumhaam-paashee ||**

## Ovee 162

येरी म्हणे सगुण निर्गुण । सिंगी सारंगीं असती दोन । आगमनिगमाचे तंतू ओंवून । सुखसंवाद करीन मी ॥

Transliteration

**Yeree mhane saguna nirgunu | Singee saarangee asatee donu | Aagama-nigamaache tantoo ovunu | Sukha-savaada kareena mee ||**

## Ovee 163

स्त्रिया म्हणती कुबडी फावडी । जीर्ण झालिया लागती देशोधडी । मग सुखशयनीं निद्रापहुडी । कोण संगीन करील जी ॥

Transliteration

**Striyaa mhanatee kubadee phaavadee | Jeerna jhaaliyaa laagatee desho-dhadee | Maga sukha-shayanee nidraa-pahudee | Kona sangeena kareela jee ||**

## Ovee 164

येरी म्हणे खेचरी भूचरी उभय । आदेय विदेह प्रकाश स्वरुपमय । वाम दक्षिण देऊनि तन्मय । डोळां लावीन निरंजनीं ॥

Transliteration

**Yeree mhane khecharee bhoocharee ubhayu | Aadeya videha prakaasha svarupa-mayu | Vaama dakshina deuni tanmayu | Dolaa laaveena niranjanee ||**

## Ovee 165

स्त्रिया म्हणती शैल्य तुटून । गेल्या पुन्हां आणाल कोठून । येरी म्हणे मोक्षयुक्तिसमान । शैल्यभूषण मिरवीन गे ॥

Transliteration

**Striyaa mhanatee shailya tutunu | Gelyaa punhaa aanaala kothunu | Yeree mhane moksha-yukti-samaanu | Shailya-bhooshana miraveena ge ||**

## Ovee 166

स्त्रिया म्हणती कर्णमुद्रिका । हरपोनि गेल्या नरपाळका । मग काय करिशील वनीं देखा । नाथपंथी मिरवावया ॥

Transliteration

**Striyaa mhanatee karna-mudrikaa | Haraponi gelyaa nara-paala-kaa | Maga kaaya karisheela vanee dekhaa | Naatha-panthee miravaavayaa ||**

## Ovee 167

येरी म्हणे वो खेचरी भूचरी । लुप्तमुद्रा कर्णद्वारीं । अलक्ष चाचरी अगोचरी । लेवविल्या गुरुनाथें ॥

Transliteration

**Yeree mhane vo khecharee bhoocharee | Luptamudraa karnadvaaree | Alaksha chaacharee agocharee | Levavilyaa guru-Naathe ||**

## Ovee 168

ऐसें बोलतां उत्तरोत्तर । म्हणे माई भिक्षा देई सत्वर । तंव त्या धांवती धरावया कर । कंठी मिठी गालावया ॥

Transliteration

**Aise bolataa uttarottaru | Mhane maaee bhikshaa daee satvaru | Tava tyaa dhaavatee dharaavayaa karu | Kanthee mithee gaalaavayaa ||**

## Ovee 169

ऐसें चांचल्यगुणयुक्त । दृष्टीं पाहूनियां नृपनाथ । कुबडी फावडी उगारीत । दूर होईं लंडी म्हणतसे ॥

Transliteration

**Aise chaanchalya-guna-yuktu | Drishtee pahuniyaa nripa-naathu | Kubadee phaavadee ugaareetu | Doora hoee landee mhanatase ||**

## Ovee 170

तें गुप्त पाहोनि मैनावती । सिद्धार्थ अन्न घेऊनि हातीं । शीघ्र येऊनि पुत्राप्रती । म्हणे भिक्षा घे नाथा ॥

Transliteration

**Tey gupta paahoni Mainaavatee | Siddha-artha anna gheuni haatee | Sheeghra yeuni putraa-pratee | Mhane bhikshaa ghe Naathaa ||**

## Ovee 171

मग भिक्षा घेऊनि झोळीं । मातेपदीं अर्पी मौळी । मग तेथूनि निघूनि तये वेळीं । नाथापाशीं पातला ॥

Transliteration

**Maga bhikshaa gheuni jholee | Maate-padee arpee maulee | Maga tethuni nighuni taye velee | Naathaa-paashee paatalaa ||**

## Ovee 172

मग जो झाला स्त्रियांत वेव्हार । तो सकळ सांगितला वागुत्तर । मैनावती येऊनि तत्पर । तीही वदे वृत्तांतासी ॥

Transliteration

**Maga jo jhaalaa striyaanta vevhaaru | Toh sakala saangitalaa vaag-uttaru | Mainaavatee yeuni tatparu | Tee-hee vade vrittaantaasee ||**

## Ovee 173

असो उभयतांचा वृत्तांत ऐकून । मान तुकावी अग्निनंदन । मग तीन रात्री रायासी ठेवून । बहुत अर्थीं उपदेशिला ॥

Transliteration

**Aso ubhaya-taanchaa vrittaanta aikunu | Maana tukaavee Agni-nandanu | Maga teena raatree raayaasee thevunu | Bahuta arthee upadeshilaa ||**

## Ovee 174

मग लुमावंतीचा उदरव्यक्त । गोपीचंदाचा होता सुत । मुक्तचंद नाम त्याचें । राज्यासनीं वाहिला ॥

Transliteration

**Maga Lumaavantee-chaa udara-vyaktu | Gopeechandaa-chaa hotaa sutu | Muktachanda naama tyaache | Raajya-asanee vaahilaa ||**

## Ovee 175

स्वयें जालिंदरें कौतुक । राज्यपटीं केला अभिषेक । मंत्री प्रजा सेवक लोक । तयाहातीं ओपिले ॥

#### Transliteration

**Svaye Jaalindare kautuku | Raajya-patee kelaa abhisheku | Mantree prajaa sevaka loku | Tayaa-haatee opile ||**

## Ovee 176

राया गोपीचंदा सांगे वचन । बा रे पाहें बद्रिकाश्रम । बद्रिकेदारालागीं नमून । तपालागीं तूं बैसें कां ॥

#### Transliteration

**Raayaa Gopeechandaa saange vachanu | Baa re paahe Badrikashramu | Badrike-daaraa-laagee namunu | Tapaa-laagee too baise kaa ||**

## Ovee 177

लोहकंटकीं चरणांगुष्ठ । देऊनि तपाचे दावीं कष्ट । द्वादश वरुषें नेम स्पष्ट । एकाग्रीं रक्षावा ॥

#### Transliteration

**Loha-kantakee charana-angushthu | Deuni tapaache daavee kashtu | Dvaadasha varushe nema spashtu | Ekaagree rakshaavaa ||**

## Ovee 178

ऐसें सांगून तयातें । मग प्रजा लोकादि समस्तें । निघाले रायासी बोळवावयातें । कानिफासुद्धां जालिंदर ॥

#### Transliteration

**Aise saanguna tayaate | Maga prajaa lokaadi samaste | Nighaale raayaasee bolavaavayaate | Kaaniphaa-suddhaa Jaalindaru ||**

## Ovee 179

परी प्रजेचे लोक शोक करिती । राया गोपीचंदाचे गुण आठविती । नेत्रीं ढाळूनि अश्रुपातीं । रुदन करिती अट्टहासें ॥

#### Transliteration

**Paree prajeche loka shoka karitee | Raayaa Gopeechandaache guna aathavitee | Netree dhaaluni ashru-paatee | Rudana karitee attahaase ||**

## Ovee 180

म्हणती अहा सांगों कायी । नृप नव्हे होती आमुची आई । पक्षाखालीं सकळ मही । संबोधीतसे महाराजा ॥

#### Transliteration

**Mhanatee ahaa saango kaayee | Nripa navhe hotee aamuchee aaee | Paksha-akhaalee sakala mahee | Sambodheetase Mahaaraajaa ||**

## Ovee 181

ऐसे वर्णूनि तयाचे गुण । आक्रंदती प्रजाजन । परी आतां पुरे करा विघ्न । शोकमांदार खोंचला ॥

**Transliteration**

**Aise varnuni tayaache gunu | Aakrandatee prajaa-janu | Paree aataa pure karaa vighnu | Shoka-maandaara khonchalaa ||**

## Ovee 182

तृणपाषाणादि तरु । पक्षी पशु जाती अपारु । राया नृपाकरितां समग्रु । शोकाकुलित मिरवले ॥

**Transliteration**

**Trina-paashaana-adi taru | Pakshee pashu jaatee apaaru | Raayaa nripaa-karitaa samagru | Shoka-akulita miravale ||**

## Ovee 183

मग एक कोस बोळवून । समस्त आणिले अग्निनंदने । जेथील तेथें संबोखून । आश्वासीत सकळांसी ॥

**Transliteration**

**Maga eka kosa bolavunu | Samasta aanile Agni-nandane | Jetheela tethe sambokhunu | Aashvaa-seeta sakalaansee ||**

## Ovee 184

परी राया जात ठायीं ठायीं । धांवूनि पाहातां उंच मही । म्हणती सोडूनि गेलीस आई । कधीं भेटसी माघारां ॥

**Transliteration**

**Paree raayaa jaata thaayee thaayee | Dhaavuni paahaataa uncha mahee | Mhanatee soduni geleesa aaee | Kadhee bhetasee maaghaaraa ||**

## Ovee 185

घडी घडी दृष्टी उर्ध्व करुन । पाहती रायाचे वदन । कोणी मागें जाती धांवून । पाहूनि वदन येताती ॥

**Transliteration**

**Ghadee ghadee drishtee urdhva karunu | Paahatee raayaache vadanu | Konee maage jaatee dhaavunu | Vadana pahuni yetaatee ||**

## Ovee 186

ऐसा राजा जातां दोन कोश । मग सकळ मिरवले एक निराश । मन मागें उलटूनि संभारास । ग्रामामाजी संचरले ॥

**Transliteration**

**Aisaa raajaa jaataa dona koshu | Maga sakala miravale eka niraashu | Mana maage ulatuni sambhaaraasu | Graamaa-maajee sancharale ||**

## Ovee 187

राजसदनीं येऊनि समस्त । सकळ बैसले दीनवंत । जैसें शरीर प्राणरहित । एकसरां मिरवलें ॥

Transliteration

**Raaja-sadanee yeuni samastu | Sakala baisale deenavantu | Jaise shareera praana-rahitu | Ekasaraa miravale ||**

## Ovee 188

मग श्रीजालिंदर राजसदनीं । मुक्तचंदा विराजूनि राज्यासनीं । मंत्रियातें पाचारुनी । वस्त्रें भूषणें आणविलीं ॥

Transliteration

**Maga Shree Jaalindara raaja-sadanee | Muktachandaa viraajuni raajyaasanee | Mantriyaate paachaarunee | Vastre bhooshane aanavilee ||**

## Ovee 189

मग जैसें जयाचे महत्व पाहून । तयालागीं भूषणें देऊन । प्रेमें गौरवूनि प्रजाजन । बोळविले स्वस्थाना ॥

Transliteration

**Maga jaise jayaache mahatva pahunu | Tayaa-laagee bhooshane deunu | Preme gauravuni prajaa-janu | Bolavile svasthaanaa ||**

## Ovee 190

याउपरी अंतःपुरीं जाऊन । सर्व स्त्रियांचें केलें समाधान । मैनावतीचे करीं ओपून । समाधानीं मिरवलें ॥

Transliteration

**Yaauparee antahpuree jaunu | Sarva striyaanche kele samaadhaanu | Mainaavatee-che karee opunu | Samaadhaanee miravale ||**

## Ovee 191

मुक्तचंद ओपूनि तियेचे करीं । म्हणें हा गोपीचंदचि मानीं । हा शिलार्थ तयाचे परीं । मनोरथ पुरवील तुमचे ॥

Transliteration

**Muktachanda opuni tiyeche karee | Mhane haa Gopeechandachi maanee | Haa shilaartha tayaache paree | Manoratha puraveela tumache ||**

## Ovee 192

ऐसें करोनि समाधान । राज्यासनीं पुन्हां येऊन । मुक्तचंदाचे हस्तेंकरुन । याचकां धन वांटिलें ॥

Transliteration

**Aise karoni samaadhaanu | Raajyaasanee punhaa yeunu | Muktachandaache hasten-karunu | Yaachakaa dhana vaantile ||**

## Ovee 193

जालिंदर कानिफा कटकांसहित । षण्मास राहिले पट्टणांत । अर्थाअर्थी सकळ अर्थ । निजदृष्टीं पाहती ॥

Transliteration

**Jaalindara Kaaniphaa katakaan-sahitu | Shanmaasa raahile pattanaantu | Arthaa-arthee sakala arthu | Nija-drishtee paahatee ||**

## Ovee 194

श्रीजालिंदरचा प्रताप सघन । कोण करुं पाहती विघ्न । येरीकडे गोपीचंदरत्न । भगिनीग्रामा चालिला ॥

Transliteration

**Shree Jaalindarachaa prataapa saghanu | Kona karu paahatee vighnu | Yereekade Gopeechanda-ratnu | Bhaginee-graamaa chaalilaa ||**

## Ovee 195

तेथे कथा होईल अपूर्व । ते पुढील अध्यायीं ऐका सर्व । अवधानपात्रीं घन भाव । कथा स्वीकारा श्रोते हो ॥

Transliteration

**Tethe kathaa hoeela apoorvu | Tey pudheela adhyaayee aikaa sarvu | Avadhaanapaatree ghana bhaavu | Kathaa sveekaaraa shrote ho ||**

## Ovee 196

नरहरिवंशी धुंडीसुत । मालु संतांचा शरणागत । तयाचे रसनेसी धरुनि हेत । अवधानपात्रीं मिरवावें ॥

Transliteration

**Narahari-vamshee Dhundee-sutu | Maalu santaanchaa sharana-aagatu | Tayaache rasane-see dharuni hetu | Avadhaana-paatree miravaave ||**

## Ovee 197

स्वति श्रीभक्तिसार । समंत गोरक्षकाव्य किमयागार । सदा परिसोत भाविक चतुर । सप्तदशाध्याय गोड हा ॥

Transliteration

**Svati shree-bhakti-saaru | Samanta Goraksha-kaavya Kimayaa-gaaru | Sadaa parisota bhaavika chaturu | Sapta-dasha-adhyaaya goda haa ||**

श्रीकृष्णार्पणमस्तु । श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ।

***Shri Krishnarpanamastu***

***Shri Dattatreyarpanamastu***

इति श्रीनवनाथभक्तिसार सप्तदशाध्याय संपूर्ण ।

***Iti Shri Navnath Bhaktisar Adhyaya Saptadasha Sampurnah***